जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७०२ दिनांक - १७/०९/२०२३**

पोलीस आ्युक्तालय,पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये

## गणेश उत्सव व ईद ए मिलाद सणांच्या अनुषंगाने कोंम्बींग ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर केली प्रतिबंधक कारवाई

श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी अगामी काळात साजरा होणा-या गणेश उत्सव व ईद ए मिलाद सणांच्या अनुषंगाने पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंम्बींग ऑपरेशन करुन गुन्हेगारांना चेकींग करुन प्रतिबंधक कारवाई करणे, तसेच हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आढळून येणारे संशयीत इसम/घटना इत्यादी कसून तपासणी करणे बाबत आदेश दिले होते. तसेच नाकाबंदी चेकींग राबवुन संशयित वाहन चालकांना चेक करणे बाबत आदेश दिले होते व त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दिनांक १६/०९/२०२३ रोजी रात्रौ २२.०० ते दिनांक १७/०९/२०२३ रोजी ०२.०० वा. पर्यत कोंम्बींग ऑपरेशन व तपासणी करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**आरोपी चेकींग अभियानमध्ये एकुण २५४४ गुन्हेगारांना चेक करण्यात आले असून त्यापैकी ७५७ गुन्हेगार मिळुन आले आहेत.**

**परिमंडळ १ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ-१ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान आ.ॲ.कलम ४/२५ प्रमाणे १ केस करुन १ आरोपीस अटक करुन त्याचेकडुन १ कोयता रु. २५०/- चा जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दारुबंदीची १ केस करुन १ आरोपींकडुन रु. ३,०१०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

**परिमंडळ २ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ-२ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी १ व गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले २ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. आ.ॲ.कलम ४/२५ प्रमाणे २ केस करुन २ आरोपीस अटक करुन त्याचेकडुन २ कोयते रु. ३००/- चे जप्त करण्यात आलेले आहे. तसेच दारुबंदीची ७ केस करुन ७ आरोपींकडुन रु. ५,७००/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. प्रोव्हिबिशन प्रमाणे १ केस करण्यात आलेली असुन १ आरोपींकडुन रु. १,१२०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या २ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे.

**परिमंडळ ३ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ-३ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले २ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच दारुबंदीची ५ केस करुन ५ आरोपींकडुन रु. ४,१९५/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. प्रोव्हिबिशन प्रमाणे १ केस करण्यात आलेली असुन २ आरोपींकडुन रु. ६००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या १ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे. तसेच कोटपाचे ९ खटले दाखल केले आहे.

**परिमंडळ ४ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-४ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले ३ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तडीपार आदेशाचा भंग केल्याने १ आरोपीस मपोका १४२ प्रमाणे १ केस करण्यात आलेली आहे. तसेच तसेच दारुबंदीची ११ केस करुन ११ आरोपींकडुन रु. ९,३५०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. प्रोव्हिबिशन प्रमाणे ५ केस करण्यात आलेली असुन ५ आरोपींकडुन रु. ७,७५५/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. ध्वनी प्रदुषण बाबत ३ केस करण्यात आलेल्या आहेत. तसेच कोटपाचे ९ खटले दाखल केले आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या १० आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे.

**परिमंडळ ५ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-५ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान आ.ॲ.कलम ४/२५ प्रमाणे ४ केस करुन ४ आरोपीस अटक करुन त्याचेकडुन ३ कोयता रु. ४००/- व १ सुरा रु. ५५०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दारुबंदीची १४ केस करुन १४ आरोपींकडुन रु. १४,८५०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. तसेच कोटपाचा १ खटला दाखल केला आहे.

**गुन्हे शाखेने केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

- **युनिट - ३ - पर्वती पोस्टे.** गुरनं. १५७/२०२३ क ३२४,३५२,३२३,५०४,३४ मधील १) आदित्य युवराज भालेराव वय १९, रा. महात्मा फले वसाहत, सिंहगड रोड, पुणे २) ऋतिक दिलीप कांबळे वय २३, रा.महात्मा फले वसाहत, सिंहगड रोड, पुणे ३) गौरव वामन चव्हाण वय २३ रा. हिंगणे खुर्द, पुणे ४) अजय राजु दास वय १९, रा. महात्मा फले वसाहत, सिंहगड रोड, पुणे यास अटक करुन पोलीस स्टेशन ताब्यात दिले.
- **अंमली पदार्थ विरोधी पथक १ - लोणी काळभोर** पो. स्टे येथे एनडीपीएस ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपी नामे अक्षय इरेश शिंदे वय २२, रा. मयुरी कॉलनी, हांडेवाडी रोड, पुणे याचे ताब्यातुन १ किलो २२७ ग्रॅम गांजा रु. २४,५४०/-, १ मोबाईल रु. ५,०००/- व १ दुचाकी ॲक्टीवा रु. ८०,०००/- मुद्देमाल जप्त करुन आरोपीस पोलीस स्टेशन ताब्यात दिले.
- आ.ॲ. कलम ४/२५ प्रमाणे ३ केसेस करुन ३ आरोपीस अटक करुन त्याचेकडुन २ कोयते रु. १,५००/- व १ लोखंडी सुरा रु. ४००/- चा जप्त करण्यात आलेला आहे. तडीपार आदेशाचा भंग केल्याने २ आरोपीविरुध्द मपोका १४२ प्रमाणे २ केसेस करण्यात आलेल्या आहेत. दारुबंदीच्या ९ केसेस करुन ९ आरोपींकडुन रु. २७,३५०/- चा दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. तसेच कोटपाचे ११ खटले दाखल केले आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या ३ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केली आहे.

**सदर विशेष मोहिमे दरम्यान एकुण कारवाईचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

- विश्रामबाग, शिवाजीनगर, सहकारनगर, उत्तमनगर, सिंहगड रोड, येरवडा, विमानतळ, चंदननगर, कोंढवा व बिबवेवाडी या पोलीस स्टेशनने बेलेबल व नॉन बेलेबल वारंट बजावणी उत्कृष्ठपणे केलेली आहे.
- मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट प्रमाणे एकुण गुन्हे शाखेने ९ केसेस करुन ९ आरोपींकडुन रोख व गावठी दारु असा रु. २७,३५०/- व पोलीस स्टेशनने ३८ केसेस करुन ३८ आरोपींकडुन रु. ३७,१०५/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महा.जुगार ॲक्ट प्रमाणे पोलीस स्टेशनने एकुण ७ केस करुन ८ आरोपींकडुन रु. ९,४७५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

➢ पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण ५५० हॉटेल, ढाबे व लॉजेस चेक, तसेच १५७ एस टी स्टॅण्ड/ रेल्वे स्थानक/ निर्जन ठिकाणे चेक करण्यात आले आहे.

➢ पोलीस स्टेशनकडुन नाकाबंदी दरम्यान ९६५ संशयित वाहन चालकांना चेक करुन २५७ जणांवर रु. २,२४,२००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

➢ वाहतुक शाखेकडुन १००७ संशयित वाहन चालकांना चेक करुन २६१ जणावंर वाहन धारकांवर कारवाई करुन रु. २,२५,८००/- दंड वसुल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार यांचे आदेशान्वये, मा.पोलीस सहआयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-१,श्री.संदीप सिंह गिल्ल, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-३,श्री.सुहेल शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५,श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील अधिकारी / अंमलदार तसेच वाहतुक विभागाकडील अधिकारी / अंमलदार यांचे पथकाने संयुक्तपणे उपरोक्त कामगिरी केली आहे. यापुढेही कोंम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी चेकींग राबवुन गुन्हेगारांचे हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

| अ.नं. | तपशील | एकुण कारवाया | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| १ | **आर्म्स ॲक्ट ४/२५** | १० | १० |
| २ | **मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट** | ४७ | ४७ |
| ३ | **जुगार केसेस** | ७ | ८ |
| ३ | **मपोकाक १४२** | ३ | ३ |
| ४ | **एनडीपीएस कारवाई** | १ | १ |
| **एकुण** | | ६८ | ६९ |